# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे - ४०१ १०१, दुरध्वनी क्र. : २८१९ २८२८.

## ।। सामान्य प्रशासन विभाग।।

जा.क्र.मनपा/सा.प्र./१०३ /२०२१ - २२ दि. १२ / ०७ /२०२१

## // परिपत्रक //

विषय :- राज्यातील सर्व शासकीय कार्यालयाने या कार्यालयात ई-ऑफीस प्रणाली अन्वये अथवा ई-ऑफीस प्रणाली नसल्यास ई-मेल अन्वये पत्रव्यवहार करण्याबाबत तसेच या कार्यालयाच्या ई-मेल ची दखल त्वरीत घेऊन विनाविलंब अहवाल या कार्यालयात सादर करण्याबाबत योग्य ते निर्देश निर्गमित करण्याबाबत.

संदर्भ :- 1.महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग (मा.तं) शासन निर्णय क्र.मातंसं . 2020/प्र.क्र.35 (अ)/से.1/का.39, दि.19/10/2020

2.शासन परिपत्रक क्र.मातंसं-2012/प्र.क्र.263/का.39, दि. 09/11/2020

3.लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त महाराष्ट्र राज्य यांचे कार्याल यांच्याकडील क्र.आस्थापना/ई-ऑफीस/2020/951/647/2021,दि.30 जून,2021 प्राप्त दि.06/07/2021

माननीय प्रभारी लोक आयुक्त यांच्या आदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, संदर्भ क्र.1 मध्ये नमुद केलेल्या शासन निर्णयान्वये लोक आयुक्त कार्यालयात माहे जानेवारी, 2021 पासून महा ई-ऑफीस प्रणाली कार्यान्वित करुन त्याचा वापर करण्यात येत आहे.

तसेच माहे ऑगस्ट, 2021 पासून लोक आयुक्त कार्यालयात कागदविरहीत कार्यालय “paperless office” ही संकल्पना कार्यान्वित होण्याकरीता महाराष्ट्र राज्यातील सर्व शासकीय कार्यालयातील पत्रव्यवहार हा सक्तीने ई-ऑफीस प्रणाली अन्वये अथवा ई-ऑफीस प्रणाली नसल्यास ई-मेल अन्वये स्विकारण्याचा निर्णय मा.प्रभारी लोक आयुक्त यांचे स्तरावर घेण्यात आलेला आहे. तरी, त्यानुषंगाने लोक आयुक्त कार्यालयात मदत कक्ष (help desk) सुरु करण्यात आला आहे. तरी राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांना निर्देश देण्यात येत आहेत की, राज्यातील जनतेला मा. प्रभारी लोक आयुक्त यांच्या कार्यालयात तक्रार दाखल करण्याकरिता आपल्या स्तरावर मदत कक्ष (help desk) सुरु करण्यात यावा.

तसेच माननीय प्रभारी लोक आयुक्त यांच्या आदेशान्वये आपणांस कळविण्यात येत की, मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यालयाकडून संबंधित कार्यालयाकडे करण्यात येणारा पत्रव्यवहार हा ई-ऑफीस प्रणाली अन्वये अथवा ई-ऑफीस प्रणाली नसल्यास ई-मेल अन्वये संबंधित कार्यालयात

soadm.lokayukta@maharashtra.gov.in या ईमेलवर सादर करण्याचे निर्देश सर्व विभाग प्रमुख / खाते प्रमुख यांना निर्गमित करण्यात येत आहे.

तसेच आपणांस असेही कळविण्यात येते की, राज्य शासनाचे सर्व कार्यालयातील कामकाज गतीमान व्हावे याकरीता आपल्या कार्यालयाकडून त्वरेने व जलद गतीने पत्रव्यवहार होण्याची आवश्यकता आहे. परंतु संबंधित कार्यालयाला ई-मेल द्वारे पत्रव्यवहार करतेवेळीस असे निदर्शनास आले आहे की, बहुता:शी शासकीय कार्यालयातील अधिकृत ई-मेल खाते कार्यन्वीत असतानाही संबंधित कार्यालयाच्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यास व त्या पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने संबंधित कार्यालयात अहवाल सादर करण्यास विलंब करण्यात येतो. परिणामी संबधित कार्यालयाला पुन्हा इतर शासकीय कार्यालयाशी दुरध्वनीवरुन संपर्क साधून या कार्यालयाच्या ई-मेलची दखल घेण्याबाबत कळवावे लागते, सदर बाब अत्यंत वेळ काढूपणाची आहे. तरी त्या अनुषंगानेही मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व विभाग प्रमुख/ खाते प्रमुख यांना आदेशित करण्यात येते की, मा. प्रभारी लोक आयुक्त यांनी दिलेल्या निर्देशाचे व सूचनाचे तंतोतत पालन करावे.

सोबत :- सहपत्र जोडले आहे.

(मारुती गायकवाड)
मा. उपायुक्त (मु.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव,
1.मा.आयुक्त,
2.मा.अति.आयुक्त

प्रति,
सर्व विभाग प्रमुख / खाते प्रमुख
मिरा भाईंदर महानगरपालिका